27 DEC 2022 तरुण भारत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# फुले-आंबेडकर चळवळीने स्त्रियांना न्याय दिला

## मुंबई विद्यापीठाच्या मराठी अधिविभागप्रमुख डॉ. वंदना महाजन यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

एकीकडे स्त्री देवतेपासून ते आईपर्यंतचे स्वरुप समाज दाखवित होता, त्याचवेळी दुसरीकडे व्यवस्थेच्या विरोधातील स्त्रियांचे मात्र नकारात्मक चित्रण करीत होता. त्यामुळे महिलांचे सामाजिक स्थान सातत्याने पुरुषी आक्रमकपणापुढे आकुंचित झाले. फुले, आंबेडकर चळवळीने स्त्रियांना न्याय मिळवून दिला, असे प्रतिपादन मुंबई विद्यापीठाच्या मराठी अधिविभागप्रमुख तथा साहित्यिक डॉ. वंदना महाजन यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे डॉ. दीपा श्रावस्ती लिखित 'आंबेडकरी चळवळीतील स्त्रिया' या संशोधन ग्रंथाचा प्रकाशन सोहळा राजर्षी शाहू सभागृहात पार पडला. याप्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते.

डॉ. महाजन म्हणाल्या, वासाहतिक कालखंडात सामाजिक-धार्मिक पुनरुत्थानाच्या चळवळी उदयास आल्या. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चळवळ अधिक जोमाने पुढे घेऊन जातात. त्याचप्रमाणे फुले यांचा स्त्रीशिक्षणाचा मुद्दाही ते तडीस नेतात. वर्गशोषण, जातीशोषण आणि पुरुषसत्ताक शोषण अशा त्रिस्तरीय शोषणाच्या त्या बळी होत्या. बाबासाहेब या सर्व स्तरांवर स्त्रीमुक्तीचा हुंकार तीव्र करतात. डॉ. दीपा श्रावस्ती यांच्या संशोधनातून बाबासाहेबांच्या चळवळीमधील स्त्रियांचे योगदान प्रकर्षाने सामोरे येते.

अध्यक्ष्यस्थानावरून बोलताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बहुआयामी व्यक्तीमत्त्वाचा अनेकांगांनी वेध घेत राहण्याची आवश्यकता आहे. हिंदू कोड बिल प्रकरणावरुन मंत्रीपदाचा राजीनामा दिला होता. त्यानंतर प्रथमच कोल्हापुरात आल्यानंतर सन १९५२ मध्ये येथील विविध जातीधर्मांच्या नऊ महिला मंडळांनी त्यांना विशेष मानपत्र प्रदान करून, त्यांचा गौरव करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली होती. डॉ. दीपा श्रावस्ती यांनी पुस्तकाचा परिचय करून दिला.

केंद्राचे संचालक तथा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. हरिष भालेराव, डॉ. गिरीष मोरे, डॉ. प्रभाकर निसर्गंध, डॉ. प्रकाश कांबळे, डॉ. योगेश साळी, डॉ. रविंद्र श्रावस्ती, प्राचार्य डॉ. प्रकाश कुंभार, डॉ. श्यामसुंदर मिरजकर, विलास सोयम आदी उपस्थित होते.

सकाळ

# प्रा. प्रशांत पाटील यांना पीएच.डी.



प्रा. पाटील

**कसबा वाळवे :** येथील प्रा. प्रशांत पाटील यांना विश्वेश्वरया टेक्नॉलॉजीकल युनिव्हर्सिटी (व्हीटीयू) बेळगाव, कर्नाटक विद्यापीठाची पीएच. डी. जाहीर झाली. त्यांनी 'मॅथेमॅटिकल मॉडेलिंग अँड ऑप्टिमायझेशन स्टडीज ऑन प्युरीफिकेशन ऑफ ऑक्सिजन अँड नायट्रोजन गॅस मिक्सचर बाय युजिंग मेंबरन्स' विषयावर शोधप्रबंध सादर केला. त्यांना डॉ. एस. एम. चव्हाण व डॉ. बी. श्रीकांत यांचे मार्गदर्शन लाभले. प्रा. पाटील शिवाजी विद्यापीठात तंत्रज्ञान अधिविभागात सहा. प्राध्यापक आहेत.